| MHBI050030432025 | | |
|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | २२.१२.२०२५ |
| | नोंदणी दिनांक | २२.१२.२०२५ |
| | निकाल दिनांक | १५.०४.२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | | ०० – ०३– २४ |

अंबाजोगाई येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश (व ) स्तर यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी– श्री.एम.बी.सोनटक्के)

विवाह अर्ज क्र. ३४१/२०२५ निशाणी क्र. १७

| | | |
|---|---|---|
| १. | गोपाळ पि. भागवत गायकवाड, वय– ३२ वर्ष, धंदा– शेती, रा.नांदडी,ता. अंबाजोगाई जि. बीड ह.मु. हिंदवी नगर, शिंदे वस्ती, ता. हवेली, उरूळी, उरूळी देवाची पुणे | ] ] ] |
| २. | आनंदिनी भ्र. गोपाळ गायकवाड, वय– २७ वर्ष, धंदा– घरकाम, रा नांदडी ता. अंबाजोगाई जि. बीड ह.मु. व्दारा व्यंकटराव ढेले, कुमठा (बु.) ता. अहमदपुर, जि. लातुर<br>विरूध्द<br>निरंक | ] ] ] ]..अर्जदार |

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.15 18:14:56 +0530

**प्रकरण :— हिंदु विवाह कायदा १९५५ कलम १३ ब प्रमाणे संमतीने विवाह विच्छेद होवून मिळणे बाबत**

---

**अर्जदारांतर्फे विदवान विधिज्ञ :— श्री.एस.व्ही. कुलकर्णी**

.......................................................................................................................

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १५ एप्रिल २०२६)

प्रस्तुत अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ कलम १३ब प्रमाणे संमतीने विवाह विच्छेद होवून मिळणे बाबत.

**थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः—**

**१.** अर्जदार यांचा विवाह दि. ३०/०४/२०२१ रोजी कुमठा (बु.), ता. अहमदपुर जि. लातुर येथे हिंदू धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे झालेला असून त्यांच्यातील वैवाहिक नातेसंबंध अद्यापपर्यंत आहेत, लग्नानंतर अर्जदार सुरूवातीचे १५–२० दिवस एकमेकांसोबत चांगले नांदले, परंतु त्यानंतर अर्जदारांच्या आवडी निवडी व भिन्न स्वभावामुळे त्यांच्यात मतभेद निर्माण होत गेले व परिणामी त्यांच्यात वाद निर्माण होउ लागले, त्यामुळे अर्जदार हे एकमेकांपासुन दि. ११/०८/२०२१ पासुन वेगळे राहु लागले, यादरम्यान दोन्ही अर्जदारांच्या नातेवाईकांनी अर्जदारांना समजावुन सांगुन त्यांच्यातील मतभेद व गैरसमज दुर करून त्यांचा संसार सुरळीत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही व अर्जदारांतील वाद वाढतच गेले त्यामुळे दि. २५.११.२०२५ रोजी अर्जदारांमध्ये चर्चेअंती अर्जदार एकत्र येण्याची शक्यता पुर्णत: मावळल्यामुळे व भविष्यात एकत्र राहण्यास अर्जदार इच्छुक नसल्याने सर्वानुमते संमतीने

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM Date: 2026.04.15 18:15:02 +0530

अर्जदारांनी घटस्फोट घेण्याचे ठरवले आहे तसेच बैठकीत अर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. २ यांना कायमस्वरूपी पोटगी म्हणून सहा लाख देण्याच्या ठरले अशा अटीवर अर्जदारांमध्ये संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरलेले आहे, भविष्यात अर्जदार हे एकत्र येण्याची शक्यता नाही व त्यांच्यातील पती पत्नीचे नातेसंबंध हे केवळ नावापुरतेच राहीले असल्याने अर्जदारांनी संमतीने विभक्त होण्याचा पुर्ण प्रयत्नाअंती व विचाराअंती निर्णय घेतला आहे, सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

२. अर्जातील कथनांवरून खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात, त्यावर कारणांसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जदार परस्पर संमतीने विवाह विच्छेदन होवुन मिळणेस पात्र आहेत काय ? | – | **होकारार्थी** |
| २ | आदेश व हुकूमनामा काय ? | – | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

३. दोन्ही अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ ***श्री. एस.व्ही. कुलकर्णी*** यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

४. अर्जातील कथनांच्या सिध्दतेकामी अर्जदारांतर्फे अभिलेखावर अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २ चे अनुक्रमे निशाणी क्र.८ व ९ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार शोभा भ्र. व्यंकटराव ढेले व सोनेराव पंडितराव कदम यांचे देखील पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अनुक्रमे निशाणी १० व ११ वर दाखल केलेले आहे. सदरचे

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.15 18:16:13 +0530

पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा पुनरोच्चार दिसून येतो. एकंदरीत अर्ज, अर्जाच्या पुष्टयार्थ अर्जदारांचे व साक्षीदारांचे दाखल पुराव्याचे प्रतिज्ञापत्र विचारात घेता अर्जदार हे त्यांच्यातील मतभेदामुळे एकत्र राहू शकत नसल्याचे तसेच मागील चार वर्षाच्या कालावधीपासून विभक्त राहत असल्याचे स्पष्ट होते. तसेच एकंदरीत अभिलेखावरील पुरावा विचारात घेता अर्जदारांनी तसेच त्यांच्या नातेवाईकांनी अर्जदारांमधील मतभेद मिटविण्याचा व त्यांचे वैवाहिक नातेसंबंध पुर्नस्थापित करण्याचा पुरेपुर प्रयत्न केला असल्याचे स्पष्ट होते, परंतु अर्जदारांमधील वैवाहिक नातेसंबंध पुर्नस्थापित होउ शकले नाहीत व भविष्यात देखील त्यांचे वैवाहिक नातेसंबंध पुर्नस्थापित होण्याची शक्यता नाही.

**५.** उभय पक्षकारांचे नातेवाईक न्यायालयात उपस्थित असताना न्यायालयाने देखील त्यांना समोपदेशन करून पती पत्नी म्हणुन एकत्र येण्याबाबत प्रयत्न केला असता त्यात यश आलेले नाही व अर्जदारांनी त्यांचे विवाह विच्छेद करून घेण्याचे संमतीने ठरल्याचे त्यांनी सांगितले. विवाह विच्छेद होवून मिळण्यासाठी प्रतिज्ञापत्रात नमूद सर्व अटी व शर्ती उभयतांना मान्य असल्याचे त्यांनी पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात व समक्ष कबुल केले आहे. एकंदरीत अर्जातील कथने, अर्जदारांचे शपथपत्रातील कथने आणि कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार दि. ११/०८/२०२१ पासून एकमेकांपासून विभक्त राहत आहेत. या प्रकरणाचे कामकाजादरम्यान उभयतांना मध्यस्थीकडे पाठविले होते परंतु, निशाणी क्र. १६ वर मध्यस्थी अहवाल प्राप्त झालेला असुन अर्जदारांमध्ये एकत्र नांदण्याबाबत तडजोड झालेली नाही व ते पुन्हा एकत्र संसार करू शकतील अशी शक्यता राहिलेली नाही, अर्जदार कोणाच्याही दबावाखाली अथवा

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM Date: 2026.04.15 18:16:27 +0530

लबाडीने विवाह विच्छेदनासाठी संमती देत नाहीत,त्यांचेमध्ये गैरहेतुने विवाह विच्छेद करून घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचे संगनमत दिसुन येत नाही.उभय पक्षकारांनी त्यांच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात खालील अटी व शर्ती मान्य केलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| १. | अर्जदार हे एकमेकांच्या वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप करणार नाहीत. |
| २. | अर्जदार हे त्यांचे भविष्याबाबत निर्णय घेण्यास स्वतंत्र असतील. |
| ३. | अर्जदार हे संमतीने घटस्फोट झाल्यानंतर दुसरा विवाह करण्यास मोकळे, हक्कदार राहतील. |
| ४. | अर्जदार यापुढे एकमेकांवरील संपुर्ण हक्क व अधिकार सोडुन देत आहेत. |
| ५. | अर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. २ यांना एक रक्कमी पोटगी रक्कम म्हणून तीन लाख ऐंशी हजार रूपये दिलेले आहेत. |
| ६. | अर्जदारांमध्ये इतर कोणतेही प्रकरण प्रलंबीत नाही. |

**६.** एकंदरीत अर्जदारांमध्ये पुनर्मिलन होण्याची शक्यता पडताळून पाहिली असता शक्यता दिसत नाही. हिंदू विवाह कायदा १९५५ कलम १३ब(२) प्रमाणे सक्तीचा सहा महिनेचा कालावधी निशाणी क्र.७ वरील आदेशाप्रमाणे माफ करण्यात आलेला आहे. अर्जदारामध्ये इतर कोणतेही प्रकरण प्रलंबीत नसल्याचे नमुद करण्यात आलेले आहे, एकंदरीत वरील कारणमीमांसा विचारात घेता तसेच तसेच नि.क्र. १२ वरील तडजोडपत्र नि. क्र. १३ वरील पुरसीस अर्जदार व साक्षीदारांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, मध्यस्ती अहवाल विचारात घेता, अर्जदार हे एकत्र राहू शकत नसल्याचे व एकत्र संसार करू शकत

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.15 18:16:34 +0530

नसल्याचे सिध्द होत असल्याने अर्जदार हे विनंती केल्याप्रमाणे संमतीने त्यांचा दिनांक ३०.०४.२०२१ रोजीचा विवाह संमतीने विच्छेदन करून मिळण्यास पात्र ठरतात. सबब मुददा क्र.१ चा निष्कर्ष "***होकारार्थी***" नोंदवितो व मुद्या क्र.२ करीता खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

| | –: **आ दे श :–** |
|---|---|
| १ | अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार क्र. १ **गोपाळ पि. भागवत गायकवाड** व अर्जदार क्र. २ **आनंदिनी भ्र. गोपाळ गायकवाड** यांचा दिनांक ३०.०४.२०२१ रोजी झालेला विवाह संमतीने हिंदु विवाह कायदा कलम १३ ब अन्वये आज दिनांक १५.०४.२०२६ रोजी पासून विच्छेदित करण्यात येत आहे. |
| ३ | येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित करणेत आला.)** |

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.15 18:16:41 +0530

दिनांक –१५/०४/२०२६ (श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,अंबाजोगाई.